# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **माननीय आयुक्त यांच्या हस्ते नागरिकांना मालमत्ता कर भरणा करणे करिता अद्यावत POS (Point of sale) मशीन प्रणाली कार्यान्वित.**

दिनांक 21/11/2023 पासून मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री संजय श्रीपतराव काटकर यांच्या हस्ते शहरातील मालमत्ता धारकांना मालमत्ता कर भरणा करणे अधिक सोयीस्कर व्हावे याकरिता अद्यावत POS (Point of sale) मशीन कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करणे अधिक सोयीस्कर व्हावे या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिकेने डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड पेमेंट व क्यूआर कोड पद्धत कार्यान्वित केली. कर भरल्याची पावती देखील त्यांना तात्काळ मिळणार आहे. नागरिकांना POS मशिनव्दारे भ्रणा केल्यानंतर ऑनलाईन My MBMC APP किंवा mbmc.gov.in या मनपा संकेतस्थळाव्दारे दुय्यम प्रत Download करण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे.यामुळे कर वसुली अधिक वेगाने होईल. मिरा भाईंदर महानगरपालिकेने देखील आता डिजिटल पेमेंट वर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी POS (Point of sale) मशिन कार्यान्वित करण्यात आली आहेत. बॅक ऑफ बडोदा ने महानगरपालिकेस 23 POS मशिन विनामूल्य दिली आहेत. या यंत्रात कर भरण्यासाठी डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड स्वॅप करून प्रशासनाला नागरिकांकडून कर स्वीकारता येणार आहे. त्याचप्रमाणे एखाद्या करदात्याला किंवा क्यूआर कोड व्दारे पैसे भरण्याचे असतील तर यंत्रात त्यांच्या कराच्या खात्यात जेवढी कराची रक्कम शिल्लक दाखवली जात आहे. तेवढ्या रकमेच्या त्यांच्या खात्यात क्रमांकाचा किंवा क्यूआर कोड जनरेट करता येणार आहे. यामुळे करदात्याला हा क्यूआर कोड स्कॅन करून पैसे भरता येणार आहे.

तरी शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या POS (Point of sale) मशिन प्रणालीचा वापर करूण मालमत्ता कराचा भरणा करुण महानगरपालिकेस सहकार्य करावे असे महापालिकेमार्फत आहावन करण्यात येत आहे.